सकाळ

# खेळाडूंनी आपले शरीरसौष्ठव जपावे : शांताराम जाधव

निफाड/भाऊसाहेबनगर, ता. १३ : खेळ हा मानवी आयुष्याचे अविभाज्य अंग आहे. शरीर हे खेळाचे साधन आहे. खेळ व क्रीडा स्पर्धांतून खेळाडू आणि जबाबदार नागरिक व विद्यार्थ्यांचे करिअर घडत असते. त्यामुळे खेळाडूंनी आपले शरीरसौष्ठव जपावे, असे आवाहन भारतीय कबड्डी संघाचे माजी कर्णधार आणि अर्जुन पुरस्कारविजेते शांताराम जाधव यांनी केले.

क. का. वाघ शिक्षण संस्था, स्माइल व स्पिनॅच नाशिक यांच्यातर्फे काकासाहेब वाघ स्मृती करंडक क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन शांताराम जाधव यांच्या हस्ते आणि स्माइल अध्यक्ष अजिंक्य वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. आंतरराष्ट्रीय पंच दीपक धावडे प्रमुख पाहुणे होते.

स्मृती करंडक क्रीडा स्पर्धेत फुटबॉल, कबड्डी, क्रिकेट, खो-खो, व्हॉलीबॉल, तलवारबाजी, बुद्धिबळ, कुस्ती, जम्परोप या क्रीडाप्रकारांचा समावेश आहे. या स्पर्धेत निफाड, चांदवड, सिन्नर, दिंडोरी, येवला तालुक्यांकरिता आयोजन केले जात आहे. अजिंक्य वाघ यांनीदेखील मार्गदर्शन करत खेळ व क्रीडांगण हे चिंतामुक्त जीवन जगण्याचे साधन असून, विद्यार्थ्यांनी हातातील मोबाईल दूर ठेवून मैदानात उतरावे, असे आवाहन केले. या वेळी स्पर्धेचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते रानवड येथून आणलेल्या क्रीडाज्योतीने ज्योत पेटवून आणि आकाशात फुग्यांचा गुच्छ सोडून करण्यात आले. या वेळी काकासाहेब वाघ, माधवराव बोरस्ते आदींच्या प्रतिमांचे पूजनही करण्यात आले. ही स्पर्धा शिक्षण संस्थेच्या भाऊसाहेबनगर, पिंपळस रामाचे, नाशिक, रानवड, चांदोरी येथील महाविद्यालयांच्या मैदानावर होणार आहे. क. का. वाघ विद्यालयाचे प्राचार्य शरद गाडे यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत केले. कारभारी मत्सागर, डॉ. शरद आहेर, रामानंद पानगव्हाणे, डॉ. राहुल घायाळ, श्रीकांत ढवळे, मुख्याध्यापक चंद्रकांत कुशारे, पिंपळस वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य चिंतामणी, डॉ. शरद आहेर, रंजना घोलप, बाळासाहेब मोंढे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदी उपस्थित होते. यशवंत ढगे यांनी सूत्रसंचालन, मुख्याध्यापिका जयश्री पानगव्हाणे यांनी आभार मानले.



**भाऊसाहेबनगर : कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती करंडक स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना शांताराम जाधव. शेजारी अजिंक्य वाघ, कारभारी मत्सागर, श्रीकांत ढवळे, रामनाथ पानगव्हाणे, चंद्रकांत कुशारे, प्राचार्य शिरसाट, श्री. क्षीरसागर आदी.**